दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.१८ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ६० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 18 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 60 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## आपला एकच नेता छगन भुजबळ साहेब

**मुंबई**–पुढे बोलताना गोपीचंद पडळकर म्हणाले, आपल्यात फुट पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे. ओबीसीचे संरक्षण महत्त्वाचे आहे. आपला एकच नेता आहे तो म्हणजे छगन भुजबळ साहेब आहेत. ते जी दिशा ठरवतील ती दिशा आपली असेल. सरसकटचे प्रकरण आले, आमच्या मामीला द्या, मामीच्या मामाला द्या, एवढे वादळ उठले होते आणि छगन भुजबळ साहेबांच्या नेतृत्वात आपण एकजूट झालो आणि ते वादळ मिटवले. गरीब मराठा समाजाच्या विरोधात आम्ही कधीच नाही. त्यांना वेगळे आरक्षण आहे, आमचा त्याला विरोध नाही.गावातले वाद सगळे संपवून टाका, आपल्यातले भांडण मिटवा आणि ते जर नाही मिटवले तर तुम्ही माती होऊन जाल. संघटित होणे गरजेचे आहे.

# विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला महाएल्गार सभेतून छगन भुजबळांचा हल्लाबोल

## जरांगेंमुळे मराठा समाज आणि आमच्यात अंतर पडले



दैनिक वादळ वार्ता
**बीड। प्रतिनिधी**

विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला. गेला तर गेला पण जीआर काढला, अशी टीका मंत्री छगन भुजबळ यांनी बीडच्या महाएल्गार सभेत बोलताना केली आहे. तसेच विखे पाटील हे गरज नसताना मनोज जरांगेंकडे जातात. भाजपच्या लोकांना मला सांगायचे आहे की तुमच्या लोकांना आवरा. मराठा समाज आणि आमच्या अंतर पडले ते अंतर अंतरवलीच्या दरीद्री पाटलामुळे पडले आहे, अशी टीका भुजबळ यांनी केली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, आरक्षण सामाजिक दृष्ट्या मागासलेल्यांसाठी आहे. तो गरिबी हटावचा कार्यक्रम नाही. हिशोब करा राज्यात ५४ टक्के ओबीसी,१३ टक्के दलीत, ७ टक्के आदिवासी, ३ टक्के ब्राह्मण त्यानंतर मुस्लिम आणि जे शिल्लक राहतात तो मराठा समाज, अशी माहिती भुजबळ यांनी दिली. तसेच आता दुहेरी लढाई लढणार, एक न्यायालयात आणि दुसरी रस्त्यावरची लढाई. आम्ही पक्षाच्या दावणीला बांधलो नाही. इथे फक्त ओबीसीसाठी लढा देत आहोत. पक्षाचे काम आल्यावर आम्ही त्यासाठी लढू. जे जे ओबीसीच्या मुळावर उठले असतील त्यांना आडवे करा, असा इशारा भुजबळ यांनी दिला.मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती आहेत, हा निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे, सर्वोच्च न्यायालयाने देखील सांगितले आहे की, मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नाही असे भुजबळ म्हणाले. भाजपच्या सगळ्या नेत्यांना सांगतोय, ओबीसीच्या ताकदीवर तुम्हाला १४५ आमदार मिळाले आहेत. त्यामुळे यावर मार्ग काढा असे भुजबळ म्हणाले.



## प्रकाश कवठेकर यांना माता सावित्री फातिमा समाजभूषण पुरस्कार जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

बीड येथील तेजस ग्रुपचे चेअरमन तथा माजी जिल्हा परिषद सदस्य ड प्रकाश दादा कवठेकर यांना माता सावित्री / फातिमा सार्वजनिक वाचनालय कुर्ला ( पूर्व ) मुंबई यांच्या वतीने माता सावित्री / फातिमा समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. याबाबत थोडक्यात माहिती अशी की, बीड येथील उद्योग क्षेत्रामध्ये नाव कमवलेले व मनमिळावू स्वभाव गरजूंना मदतीचा ध्यास सामाजिक कार्याची आवड आणि आदर्श व्यक्तिमत्व या गुणामुळे ड प्रकाश दादा कवठेकर यांनी अल्पावधीतच जनमानसात ठसा उटवला आहे. सर्वसामान्य कुटुंबातून स्वतःच्या हिमतीवर प्रगती करून युवकासमोर प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे. स्वतः नोकरी न करता व्यवसायामध्ये तेजस इलेक्ट्रिकल च्या माध्यमातून व्यवसायाला सुरुवात केली आणि आज ऑक्सितेज मिनरल वॉटर, तेजस प्रोडक्शन कंपनी, तेजस अर्थमूव्हर्स, तेजस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, तेजस डिजिटल मार्केटिंग आदी, या उपक्रमाद्वारे आणि आपल्या



सामाजिक बांधिलकी जपत कायम आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या कार्याबद्दल वाचनालयाच्या वतीने समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असून हा पुरस्कार सोहळा दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता माननीय बाळासाहेब ठाकरे समाज केंद्र नेहरूनगर कुर्ला (पूर्व) मुंबई येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकाने वतीने केले आहे.

## केज येथे बसस्थानका समोर भर रस्त्यावर थरार
### दोन गटात तलवार,चाकू व लोखंडी झाल्याने हाणामारी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील बसस्थानका समोर भर रस्त्यावर सोमवारी रात्री ९ वाजण्या च्या दरम्यान दोन गटात तलवार,चाकू व लोखंडी झाल्याने हाणामारी झाली असून परस्पर विरोधात एकूण १६ जणांविरुद्ध केज पोलिसात गुन्हे नोंद झाले आहेत.सोमवारी दि. १३ ऑक्टोबर रोजी रात्री साडे आठ वाजण्याच्या दरम्यान दुचाकीचा धक्का लागल्याच्या कारणावरून लोखंडी झाल्याने,बेल्टने व लाथा बुक्क्याने मारहाण करून खाली पाडून डोक्याचे केस पकडून मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देऊन





धार्मिक भावना दुखावल्याची फिर्याद वेल्डिंगचे वर्कशॉप चालविणाऱ्या धरमसिंग दिलदारसिंग गोके याने दिल्यावरून सय्यद इर्शाद, सय्यद इम्रान,सय्यदगज्जू, नदीम सय्यद,अजहरशेख, अल्ताफ शेख,सोहेल पठाण,बब्या ( पूर्ण नाव माहित नाही )या आठ जणांविरुद्ध केज पोलिसात सोमवारी रात्री साडे आकरा वाजता गुन्हा नोंद करण्यात आला आहे

तर दुसऱ्या प्रकरणात सोमवारी रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान आरोपीतांनी संगनमत करून सय्यद इर्शाद व त्याच्या भावावर त्यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने तलवारीने,चाकूने,छातीत, डोक्यात,व उजव्या पायाच्या मांडीवर वार करून जखमी करून जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपावरून सय्यद इर्शाद यांच्या फिर्यादीवरून शंकरसिंग गोके,अमरसिंग गोके, दिलदारसिंग गोके व इतर अनोळखी ४ मिळूनएकूण ७ आरोपी विरुद्ध केज पोलिसात बुधवारी रात्री साडे दहा वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्हीही गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश क्षीरसागर हे करीत आहे.

## कपिलधारवाडीतील सर्पदर्शमुळे गायीचा मृत्यू गावकऱ्यांची शासनाकडे मदतीची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**बीड। प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी सुंदरराव बलभीम शिंदे यांच्या दुभत्या गायीचा सर्पदर्शनामुळे मृत्यू झाला असून, या घटनेने शिंदे कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे.गावातील भूस्खलन आणि घरांना तडे गेल्याने महावितरणकडून वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे गाव अंधारात बुडालेले असताना, सर्पाने गोठ्यात प्रवेश करून गायीवर हल्ला केल्याचे समजते.शेतकरी शिंदे यांचे मुख्य उत्पन्न दुभत्या गायींच्या दुधावर अवलंबून आहे. त्यामुळे या गायीच्या मृत्यूमुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याशिवाय वीज नसल्याने गुरांसाठी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे.



### शेतकऱ्यास नुकसान भरपाईची मागणी

**ग्रामस्थांनी प्रशासनाकडे पंचनामा करून शिंदे यांना योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाने तत्काळ मदत न केल्यास शेतकरी व पशुसंवर्धन क्षेत्र दोन्हीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.**

गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, वीज व पाणी व्यवस्थेच्या अभावामुळे गुरे व शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. त्यांनी शासनाकडे तातडीने वीजपुरवठा सुरू करण्याची व गुराढोरांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

सध्या कपिलधारवाडीतील काही कुटुंबे स्थलांतरित झाली आहेत, तर उर्वरित ग्रामस्थ शासनाच्या मदतीची वाट पाहत आहेत. गावकऱ्यांचे मत आहे की, प्रशासनाने योग्य ती उपाययोजना न केल्यास अशा घटना पुन्हा घडू शकतात.

## राशन दुकान क्रमांक १४ मध्ये काळाबाजाराचा आरोप ?
### आझाद क्रांती सेनेचे थोरात यांचे तहसीलदारांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील फुलेनगर भागातील शिधा दुकान क्रमांक १४ येथे काळाबाजार सुरू असल्याचा गंभीर आरोप आझाद क्रांती सेनेचे तालुका प्रमुख शरद सूर्यकांत थोरात यांनी केला असून, त्यांनी या संदर्भात १५ ऑक्टोबर २०२५ रोजी केज तहसीलदार यांना निवेदन सादर केले आहे.

फुलेनगर येथील राशन दुकान क्रमांक १४ चे मालक सुरेश तात्या पाटील असून, त्यांनी हे दुकान सुभाष उर्फ सुबराव गालफाडे यांच्याकडे चालविण्यास दिले आहे. मात्र, सदर चालक हा तहसील कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांशी सखोल संबंध ठेवून गोरगरीब जनतेचे शिधा अडवत असल्याचा आरोप थोरात यांनी केला आहे.

लाभार्थ्यांना अंगठा लागत नाही, राशन




संपले, कार्ड रद्द झाले अशा कारणांवरून परत पाठवले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच गहू व तांदूळ हे साहित्य काळ्या बाजारात, हॉटेल चालकांना विकले जात असल्याचेही थोरात यांनी आरोपात नमूद केले आहे.थोरात यांच्या म्हणण्यानुसार, वारंवार इशारे दिल्यानंतरही सुभाष गालफाडे यांचा गैरप्रकार थांबलेला नाही. गोरगरीब जनतेला अन्नधान्य न देता हा खुलेआम काळाबाजार करत आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ कारवाई करून हे दुकान त्याच्याकडून काढून घ्यावे व योग्य व्यक्तीच्या मार्फत धान्यवाटप व्हावे.

तसेच, जर प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही, तर आम्ही अन्नत्याग आंदोलन छेडू. माझ्या जीवास काही झाले तर त्याची जबाबदारी तहसीलदार, गोडाऊन कीपर आणि सदरील राशन दुकान चालकाची राहील, असा इशाराही थोरात यांनी दिला आहे.प्रशासनाने या गंभीर आरोपांची दखल घेऊन योग्य ती चौकशी व कारवाई करावी, अशी मागणी आझाद क्रांती सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर केला अत्याचार,आरोपी विरुद्ध पोस्कोचा गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील एका खेडेगावातील अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तब्बल ९ वर्षे तिच्यावर अत्याचार केल्या प्रकरणी संभाजी दत्तू ढगे रा.केवड याच्या विरुद्ध केज पोलिसात पोस्को अंतर्गत गुन्हा नोंद झाला आहे.केज तालुक्यातील एका खेडेगावातील अल्पवयीन मुलीवर दि.२०/२/२०१४ ते दि.१०/२/२०२३ दरम्यान पीडिता ही अल्पवयीन असताना तीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्या सोबत वारंवार शारीरिक संबंध करून तिच्यावर अत्याचार केल्या प्रकरणी बुधवारी रात्री ९-३० वाजता केज पोलिसात गुन्हा नोंद झाला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम हे करीत आहेत.




## कै.चंद्रकलाताई गदळे यांच्या वर्षश्राध्द कार्यक्रमानिमित्त रविवारी ह.भ.प.श्री. समाधान शर्मा महाराज यांच्या कीर्तनाचे दहिफळ (वडमाऊली) येथे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील सेवानिवृत्त प्राचार्य तथा शालेय संस्थापक अध्यक्ष सखाहारी तात्या गदळे यांच्या पत्नी व भाजपा युवा मोर्चाचे केज तालुकाध्यक्ष राहुल भैय्या गदळे यांच्या मातोश्री कै. सौ.चंद्रकलाताई सखाहारी गदळे यांच्या चतुर्थ वर्षश्राध्द कार्यक्रमा निमित्त दि.१९ ऑक्टोबर रविवार रोजी सकाळी साडेदहा वाजता सुप्रसिद्ध रामायनाचार्य विविध कथा व किर्तनकार भावरत्न ह.भ.प.समाधान शर्मा महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी या कार्यक्रमाला आपण उपस्थित रहावे अशी विनंती गदळे परीवाराच्या वतीने करण्यात आली आहे.याबाबत





सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील येथील सेवानिवृत्त प्राचार्य तथा शालेय संस्थापक अध्यक्ष सखाहारी (तात्या) गदळे यांच्या पत्नी व भाजपा युवा मोर्चाचे केज तालुकाध्यक्ष राहुल भैय्या गदळे यांच्या मातोश्री कै.सौ.चंद्रकलाताई सखाहारी गदळे यांच्या चतुर्थ वर्षश्राध्द कार्यक्रमा निमीत्त दहिफळ (वडमाऊली) ता.केज येथील श्रीक्षेत्र वडमाऊली मंदीराजवळ सखाहारी (तात्या) गदळे यांनी स्थापन केलेल्या शिव प्रतिष्ठाण संस्थान येथे सुप्रसिद्ध रामायनाचार्य व विविध कथा,कीर्तनकार ह.भ.प.समाधान शर्मा महाराज यांच्या सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रम रविवार दि.१९ ऑक्टबर रोजी सकाळी १०- ३० वाजता आयोजित केला आहे.या कार्यक्रमास आपण उपस्थित रहावे अशी विनंती ह.भ.प. सखाहारी (तात्या) गदळे, राहुल भैय्या गदळे,शरद बप्पा गदळे,सरपंच अनिताताई गदळे, डॉ.शशिकांतदहिफळकर, जयदत्त दहिफळकर व गदळे परिवाराने केली आहे.

संपादकीय

# ग्रंथ हेच गुरू

अलीकडे वाचनाची आवड कमी होऊ लागली आहे असे अनेकजण म्हणतात, ते थोडेफार खरे असले तरी दूरदर्शनमुळे वाचण्याऐवजी ऐकण्यात आणि पाहण्यातच अनेकांचे मन गुरफटून जाते. असे असले तरी केवळ प्रेक्षक वा श्रोता होण्याने सर्वांच्या मनाची भूक भागत नाही. एकदा लहानपणी पुस्तकांशी मैत्री झाली की, ती संगत कधी सुटत नाही. जीवनातले अनुभव अधिक डोळसपणे देण्याची शक्ती पुस्तक आपल्याला देतात. आपलं व्यक्तिमत्त्व अधिक सुजाण संपन्न करतात. 'वाचनालयाविना शाळा म्हणजे शस्त्रगाराविना किल्ला होय' पूर्वीच्या काळी देशाभिमानाने प्रेरित होऊन समाज शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली ही ग्रंथालये म्हणजे स्वातंत्र्यप्रेमाची व जागृतीची प्रतीकेच आहेत. 'पुस्तक वाचल्यावर मस्तक तयार होतं आणि मस्तक तयार झाल्यावर माणूस कुठेही नतमस्तक होत नाही,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. आज विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक तथा समाजातील सर्वच घटकांचे वाचन कमी होत आहे हे वास्तव आपल्याला नाकारता येणार नाही. वाचनाद्वारे व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक गोष्टी सहाय्यभूत ठरतात. हे जवळपास प्रत्येक यशस्वी क्षेत्रातील तज्ज्ञ तथा अनुभवी व्यक्तींचे मत आहे. आज विद्यार्थी वर्ग केवळ मिळेल त्या साधनांद्वारे फक्त माहिती गोळा करीत आहे. अभ्यासक्रमाशी पूरक असणाऱ्या उपयुक्त वाचनाकडे अनेकांचा कल आहे; परंतु मूळ कलाकृतीचा अभ्यास करण्याकडे, वाचन वाढवण्याकडे अनेकांचे दुर्लक्ष होत आहे. देशाला महासत्ता बनवण्याचे ज्यांनी प्रथम स्वप्न पाहिले ते आपले राष्ट्रपती भारतरत्न भारताचे मिसाईल मॅन डॉक्टर ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या राष्ट्रीय कार्याची दखल म्हणून त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिनाच्या रूपात आज सर्वत्र सर्व शाळांमध्ये साजरा करण्यात येतो; परंतु हा एक दिवसाचा कार्यक्रम न राहता त्यात सातत्य राहणे गरजेचे आहे.'वाचाल तर वाचाल, ग्रंथ हेच गुरू, पुस्तक मस्तक घडवतात, प्रसंगी अखंडित वाचीत जावे अशी अनेक वाक्य कानावर येतात. पण कोण लक्षात घेतो? मोबाइल, इंटरनेटच्या जमान्यात वाचन दुर्लक्षित झाले का? अन् असेल तर तो खजिना आजच्या विद्यार्थ्यांना कसा उपलब्ध करून देता येईल. आज जे काही विद्यार्थ्यांकडून वाचले जाते ते केवळ पाठ्यपुस्तकांमधीलच. शिक्षक आपले अभ्यासक्रमामध्ये, तर विद्यार्थी त्यांच्या परीक्षेच्या अभ्यासात गुंग, कुणालाच दोष देता येणार नाही. पण जेवण जसे चौरस असावं तसं वाचन देखील चौफेर असावे. सार्वजनिक तसेच महापालिकेची वाचनालये आज ओस पडत असल्याचे दिसते.ज्येष्ठ नागरिक सोडता तरुणांनी वाचनालयाकडे पाठ फिरवली आहे. हा सोशल मीडियाचा परिणाम आहे. काही ठिकाणी वाचक आहेत पण वाचनालयात दर्जेदार पुस्तके, साहित्य ग्रंथ, उपलब्ध नाहीत. बऱ्याच वेळा भरमसाट पुस्तके प्रसिद्ध होतात. त्यातील ठरावीक पुस्तकांची विक्री होते मग वाचन कमी झाले अशी ओरड सुरू होते. या ओरडण्याला तसा अर्थ नाही. हा निराशावादी दृष्टिकोन आहे. असे मला वाटते वाचनाचे अनेक पर्याय सध्या आपल्याकडे आलेले आहेत. पारंपरिक छापील पुस्तकांबरोबर आधुनिक अशा ई-बुक सारख्या पुस्तकांमुळे पुस्तकांचे विश्व अधिकच रुंदावले आहे. किंबहुना यामध्ये रोजच भर पडत आहे. आधुनिक साधनांमुळे कमी जागेत, कमी खर्चात जास्त संख्येने पुस्तकं साठवली जातात. आज ऑनलाईन पुस्तकांच्या माध्यमातून अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. विविध पुस्तकांवर भरपूर सूट, प्रदर्शन व ऑनलाइन विक्रीमध्ये मिळत असल्याने वाचक पुस्तक खरेदी करणे पसंत करत आहेत. सध्या वाचकांच्या घरी स्वतःची छोटी छोटी वाचनालये उदयास येत आहेत, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सध्या वाचन संस्कृतीने आपल्या पारंपरिक ढाचा बदलून नवा ढाचा तयार केला आहे. जोपर्यंत मानवाला ज्ञानलालसा आहे तोपर्यंत वाचन संस्कृती लयास जाणे कदापिही शक्य नाही. आताचे जग ऑनलाइन वाचनालयाचे आहे. विविध लेखकांचे ब्लॉग, विविध लेख, पेज, ई-पेपर याद्वारे लेखन वाचकांसाठी उपलब्ध होत आहे. विविध ऑनलाईन ॲप्स, पीडीएफ स्वरूपात उपलब्ध पुस्तके मोबाइलवर उपलब्ध आहेत. यामुळे वाचनालय आपल्या सदैव सोबती अशा परिस्थितीमुळे ग्रामीण व शहरी भागातील वाचनालये सुनी सुनी झाल्याचे आपल्याला पाहायला मिळते. दुसरीकडे मात्र आजही मुंबई-पुणे यांसारख्या शहरात लोकल ट्रेन, एसटी यामध्ये पुस्तके वाचणारी अनेक मंडळी आपल्याला निदर्शनास पडतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त एसटी बसमध्ये वाचनालयाची संकल्पना सध्या पाहायला मिळते. त्याशिवाय पुस्तकांचे गाव भिलार ही याची आदर्श उदाहरणे सांगण्यात येतील.सध्याचे पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालणे पसंत करतात. त्यामुळे मराठी विषयाची आवड नसल्याने मराठी वाचनालयाकडे त्यांनी पाठ फिरवली आहे. दुर्दैवाने आपली मराठी अन्य भाषेच्या तुलनेत काहीशी मागे पडत आहे. ती पुढे येणे गरजेचे आहे. आजच्या इंटरनेटच्या आभासी युगात वाचनासाठी उसंत थोडीफार कमी झाली आहे. मोबाइल, फेसबुक, व्हॉट्सॲप विविध मनोरंजनात्मक गेम्स, टीव्हीचे शेकडो चॅनल्स यामुळे मनोरंजनाची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. यातून साहित्याची गरज संपुष्टात येईल का? या प्रश्नाचे उत्तर देताना ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोतोपल्लींनी म्हटलंय... उद्या विज्ञान तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या गुंतागुंतीतून सुटकेच्या धडपडीसाठी उन्नत अर्थव्यवस्थेने कोंडलेल्या श्वासाला विरोध करण्यासाठी निर्मळ जगण्यास शेवटी माणसाला साहित्याच्या आश्रयाला यावे लागणार. दुसरा आश्रय कोणता असणार आहे. गुगलमुळे पडलेल्या प्रश्नांना क्षणात उत्तर शोधणे सोपे झाल्यामुळे चिकित्सा व चिकिस्तकवृत्ती कमी झाली आहे. गेल्या काही वर्षांत रेडिओ, इंटरनेट, दूरचित्रवाणीचा विकास आणि वापर झपाट्याने वाढला पण वृत्तपत्रे आणि पुस्तकांना जगातून हद्दपार करण्यात माध्यमांना यश आलेले नाही, रेडिओद्वारे ऐकू येणारे शब्द व दूरचित्रवाणीवरील चित्रे यांचा मनावर तत्काळ परिणाम होतो पण तो वरवरचा असतो टिकाऊ नसतो. आजही कमी खर्चाचे व चटकन उपलब्ध होणारे ज्ञानाचे साधन म्हणजे पुस्तकेच आहेत.पुस्तके वाचून मोठमोठ्या चळवळी उभ्या केलेल्या व्यक्ती वर्तमानकाळात सुद्धा आपल्यासमोर आहेत. साहित्य संमेलन, प्रबोधनवादी मेळावे यात पुस्तकांची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होतच असते व आजही अनेक पुस्तके जन्माला येत आहेत. त्यांचा वेग मंदावलेला नाही यावरून जरी वाचनालय सुनी सुनी झाली तरी वाचन कमी झालेले नाही हे लक्षात येते. आजच्या काळात 'वाचाल तर वाचाल' हे बाबासाहेबांचे शब्द सार्थ वाटतात व अनेक वेळा मार्गदर्शक ठरतात. सध्या प्राथमिक शिक्षण स्तरावर विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन, क्षमता विकसित करण्यासाठी अनेक प्रकारचे उपक्रम देखील शासनाने हाती घेतले आहेत. आपणही सर्वांनी एक पाऊल पुढे टाकत वाचन संस्कृती जोपासण्यासाठी नियमित वाचन करणे गरजेचे आहे.

# वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत अशीही 'घुस'खोरी


वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वाचे मानले जाणारे एमबीबीएस शिक्षण प्राप्त व्हावे, या दृष्टीने लाखो विद्यार्थी व पालक जीवाचे रान करतात. विशेष म्हणजे अभ्यासाबरोबरच यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची जुळवाजुळव इयत्ता अकरावीपासूनच करावी लागते. अशा परिस्थितीत आपल्या राज्यात परराज्यातील विद्यार्थ्यांनी येऊन आपल्या हक्काची जागा बळकावत आहेत. हे प्रकरण मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी उघडकीस आणले व यामुळे अशा गैरप्रकाराने महाराष्ट्रात घुसखोरी केलेल्या परराज्यातील १५२ विद्यार्थ्यांना राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे नोटीस बजावण्यात आली.महाराष्ट्रातील वैद्यकीय प्रवेशाची तिसरी फेरी सुरू आहे. तिसऱ्या फेरीची अस्थाई गुणवत्ता यादी जाहीर केल्यानंतर नवीन इच्छुक विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अर्ज भरला; परंतु या नवीन इच्छुक विद्यार्थ्यांच्या कागदपत्राबाबत मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी सीईटी कक्षाकडे तक्रारी केल्या. त्या तक्रारीची सीईटी कक्षाने प्राथमिक तपासणी केली असता त्यामधील १५२ विद्यार्थ्यांनी अपलोड केलेली कागदपत्रे चुकीची असल्याचे आढळून आले आहे. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी जागरूकता दाखवून हे प्रकरण उघडकीस आणले असले तरी आतापर्यंत महाराष्ट्रात हजारो विद्यार्थ्यांनी या पद्धतीने प्रवेश मिळवत वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले असल्याची दाट शक्यता आहे. हा प्रकार केवळ मराठवाड्यातील विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा नसून यामुळे महाराष्ट्रातील अनेक गरजू व इच्छुक विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय झालेला आहे. वैद्यकीय प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या १५२ विद्यार्थ्यांना नोटीस बजावण्यात आली, इथपर्यंत ठीक असले तरी राज्यात अशा गैरमार्गाने वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळवून देणारे काही खूप मोठे रॅकेट कार्यरत आहे. महाराष्ट्रात एमबीबीएस प्रवेशासाठी तिसऱ्या फेरीची अस्थायी गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांच्या कागदपत्राबाबत सीईटी कक्षाकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सीईटी कक्षाने या तिसऱ्या फेरीमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अर्ज भरला त्यांच्या सर्व कागदपत्राची तपासणी केली असता त्यातील १५२ विद्यार्थ्यांची कागदपत्रे चुकीची असल्याचे प्रथमदर्शी आढळून आले. मराठवाड्यातील काही जागरूक विद्यार्थी व पालकांनी याबाबत मुळाशी जाऊन जवळपास चौदाशे नऊ पानांच्या विद्यार्थ्यांच्या यादीचा अभ्यास केला. त्या यादीत असलेली नावे महाराष्ट्र बाहेरील आहेत हे सिद्ध झाले. एवढेच नव्हे तर त्या यादीतील अनेकांनी परराज्यात प्रवेश मिळविला. तो प्रवेश त्यांनी स्वतःच्या राज्यासाठी राखीव असलेल्या कोट्यातून मिळविला होता.



म्हणजेच ते विद्यार्थी त्या राज्यातील रहिवासी आहेत हे सिद्ध होते. मग असे असताना त्या परराज्यातील विद्यार्थ्यांनी पुन्हा महाराष्ट्राच्या राखीव कोट्यात असलेल्या प्रवेशाच्या यादीत कसे स्थान मिळविले? हा खूप मोठा प्रश्न आहे. याचाच अर्थ ही सर्व प्रक्रिया पाहणारी यंत्रणा सपशेल अपयशी आहे, हे देखील सिद्ध होते. मराठवाड्यातील पालक व विद्यार्थ्यांनी याबाबत आवाज उठविल्यानंतर सीईटी कक्षाने या १५२ विद्यार्थांना याबाबत ईमेलद्वारे नोटीस पाठविण्यात आली. या विद्यार्थ्यांना परत मूळ व मूळ कागदपत्रे सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जे विद्यार्थी त्यांची मूळ कागदपत्रे अपलोड करणार नाही, त्या विद्यार्थ्यांचा समावेश तिसऱ्या वैद्यकीय प्रवेश फेरीत समावेश होणार नाही. राजस्थानमधील तब्बल ६० विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे रहिवासी असल्याचे खोटे प्रमाणपत्र तयार करून वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत घुसखोरी केल्याचे गंभीर प्रकरण मराठवाड्यातील नांदेड येथील विद्यार्थ्यांनी समोर आणले. या बनावट रहिवासी प्रमाणपत्रांच्या आधारे त्यांनी एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीत स्थान मिळवले. घुसखोरी करत त्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेण्याची तयारी सुरू केली होती. या प्रकारामुळे महाराष्ट्रातील खऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त होते. या विषयावर मराठवाड्यातून आवाज उठविण्यात आला. मुख्यमंत्री, राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि केंद्रीय मंत्र्यांनी तत्काळ लक्ष घालण्याची मागणी करण्यात आली. संपूर्ण देशभरातील वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देताना १५ टक्के ऑल इंडिया कोटा राखीव असतो, तर उर्वरित ८५ टक्के जागा संबंधित राज्यातील स्थानिक विद्यार्थ्यांसाठी असतात.सध्या तिसऱ्या फेरीची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. याच प्रक्रियेत राजस्थान, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, हरियाणा, पंजाब, गुजरात आणि केरळ या राज्यांतील शेकडो विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रात प्रवेश मिळवण्यासाठी खोटे रहिवासी प्रमाणपत्र सादर केल्याचे समोर आले आहे. विशेष बाब म्हणजे या विद्यार्थ्यांपैकी अनेकांनी पूर्वी त्यांच्या मूळ राज्यात विविध प्रवर्गातून प्रवेश मिळवलेला आहे. असे असताना देखील महाराष्ट्रात मात्र नवीन ओबीसी किंवा इतर आरक्षण प्रवर्गाचा त्या विद्यार्थ्यांनी आधार घेतल्याचे उघड झाले आहे. उदाहरण द्यायचे झाले तर राजस्थानमधील काही विद्यार्थी त्यांच्या राज्यात अनुसूचित जाती (डउ) प्रवर्गातून पात्र ठरले होते, पण तेच विद्यार्थी महाराष्ट्रात ओबीसी प्रवर्गातून पात्र ठरल्याचे दिसते, या प्रकरणावरून मराठवाड्यातील जागरूक पालक व विद्यार्थ्यांनी याबाबत आवाज उठविला.चुकीच्या पद्धतीने वैद्यकीय प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे तर फावते; परंतु जे खरोखर एमबीबीएसला प्रवेश घेण्यासाठी आपल्या महाराष्ट्रातील विद्यार्थी पात्र आहेत अशांवर खूप मोठा अन्याय होतो. भविष्यात अशा फसवणुकीच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात घुसणारे विद्यार्थी गुन्हेगारी प्रवृत्तीचे डॉक्टर म्हणून समाजात वावरू शकतात. महाराष्ट्र शासनाने अशा विद्यार्थ्यांची तत्काळ चौकशी करून, त्यांना प्रवेश प्रक्रियेतून बाद करावे. चुकीच्या पद्धतीने एमबीबीएसला प्रवेश मिळवू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांवर तसेच त्यांच्या पालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी मराठवाड्यातील विद्यार्थी व पालकांनी केली आहे. अशा विद्यार्थ्यांना किमान पाच ते सहा वर्षांसाठी वैद्यकीय शिक्षणापासून निलंबित करण्याची मागणीही पुढे आली आहे. सर्वोच्च न्यायालयानेही पूर्वी अशाच प्रकारच्या फसवेगिरीच्या प्रकरणात आरोपी विद्यार्थ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते.

# सिंधुदुर्ग पहिला!

हिंदुस्थानच्या गेले अनेक शतकांतल्या विविध आघाड्यांवरच्या पराभवाचं मूळ इथल्या जातिव्यवस्थेत, जातीच्या उतरंडीत आणि भेदाभेदात आहे, हे सर्व विचारसरणीच्या इतिहासकारांना, समाजशास्त्रज्ञांना आता मान्य आहे. ही कमी दूर करण्यासाठी भारतीय समाजजीवनातून जातीचं उच्चाटन केलं पाहिजे, हेही बहुतेक सगळ्या समाजशास्त्रज्ञांनी, राजकीय नेत्यांनी स्पष्टपणे मांडून झालं आहे. त्या दिशेने अनेक समाज सुधारकांनी गेलं शतक-दीड शतक प्रयत्नही केले आहेत. यातल्या काहींना धर्मचिकित्सेशिवाय ते शक्य नाही, असं वाटत होतं; म्हणून त्यांनी धर्मचिकित्सेचा मार्ग स्वीकारला. काहींनी पुरोहित शाहीवर आघात केले, काहींनी पुनर्जन्माची कल्पना पुसण्याचा प्रयत्न केला, काहींनी जन्म-मृत्यूच्या निसर्गचक्राला वैज्ञानिक परिभाषेत उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला. काहींनी जातिभेद मिटवण्यासाठी सहभोजन, मंदिर प्रवेशांचे कार्यक्रम आखले, तर काहींनी आंतरजातीय विवाहांशिवाय ही व्यवस्था मोडीत काढता येणार नाही, या विश्वासापोटी त्या दिशेने प्रयत्न केले. प्रत्येकाचं उद्दिष्ट एकच होतं; मार्ग भिन्न होते. त्यातून जातींची तीव्रता निवळली. आधुनिक जगण्यानेही त्यात बदल केले. नव्या तंत्रज्ञानाने नव्या अर्थरचना जन्माला घातल्या. त्या अर्थरचनांनी उत्पादक साधनं बदलली. त्याचाही परिणाम घट्ट जाती व्यवस्था काहीशी सैल होण्यात झाला. परस्पर संपर्काच्या, दळणवळणाच्या साधनांनीही यात बराच फरक झाला. बंदिस्त जातीव्यवस्था या सगळ्यामुळे थोडी खुली झाली. पण, तरीही तिची सैल तटबंदी अधिक लवचिक करत ती सांभाळण्याचे प्रयत्नही सुरूच राहिले. देव-देवतांपासून पूजा-अर्चेपर्यंत आणि सणवार, खाण्याच्या सवयींपासून राहणीमानापर्यंत अनेक बाबींनी त्याला आधारच दिला. 'राजकारणातून जात हटवा'पासून 'आरक्षणातून जात हटवा'पर्यंत अनेक लक्षवेधक घोषणाही झाल्या. या सगळ्याला पचवून जात राहिलीच, तेव्हा 'जात नाही, ती जात, अशी जातीची व्याख्या करून अनेकांनी आपले हात टेकले!



जातीचं अस्तित्व व्यक्तीच्या व्यक्तिगत आयुष्यात आणि सार्वजनिक जीवनात अशा दोन पातळ्यांवर असतं. व्यक्तिगत आयुष्यात राज्यसत्तेने किती हस्तक्षेप करायचा, याला मर्यादा आहेत. भारतीय संविधानानेच व्यक्तीला तसं संरक्षण दिलं आहे. त्यामुळे, अनेक सामाजिक आजारांचं मूळ असलेल्या या जातीला नागरिकांच्या वैयक्तिक आयुष्यातून हटवायचं असेल, तर ते पूर्णतः व्यक्तीच्या तशा निवडीनेच होऊ शकेल. व्यक्तीला त्यासाठी प्रवृत्त करावं लागेल. प्रबोधन हाच त्यासाठी प्रभावी उपाय आहे. पण, सार्वजनिक जीवनातल्या अशा बाबींच्या नियंत्रणात, अंमलबजावणीत राज्यसत्तेला हस्तक्षेप करणं सहज शक्य आहे. कायदे, नियम, तरतुदींची अनेक आयुधं त्यासाठी लोकनियुक्त सरकारकडे आहेत. सार्वजनिक जीवनातील जातीचं अस्तित्व, तिचा उल्लेख आणि प्रभाव कमी करण्यासाठी जातीवाचक बाबी हटवणं हा एक मार्ग आहे. सरकार जाती निर्मूलनासाठी खरोखर प्रामाणिक असेल, तर आपल्या राजकीय इच्छेने, शासन अधिकारात सरकार या बाबी निश्चितच करू शकतं. शहरांची आणि शहरातील भागांची, ग्रामीण भागात गावांची किंवा गावातील विविध भागांची जातीवाचक नाव हटवणं, हे अशा प्रयत्नातील महत्त्वाचं पाऊल ठरू शकतं. महाराष्ट्रात सरकारने तशा प्रकारचा निर्णय घेतला असून सर्व जिल्ह्यांना त्यासाठी मार्गदर्शक पद्धती, नावांची निवड करण्याबाबत द्यायचे प्राधान्यही कळविले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याने सोमवारी याबाबतचा क्रांतिकारक निर्णय घेतला असून जिल्ह्यातील १९२ वस्त्यांची आणि २५ रस्त्यांची नांवं बदलण्याचं ठरवलं आहे. पालकमंत्री नितेश राणे आणि जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे या दोघांचंही त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राने विशेष कौतुक केलं पाहिजे.ज्या ज्या ठिकाणी जातीचा निर्देश किंवा सांकेतिक उल्लेख होतो, त्या सर्व ठिकाणी ही काळजी घेणं हीच आधुनिक युगाची कसोटी म्हणता येईल. राज्यात पूर्वी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार' दिले जात असत. त्याचं नामांतर काही काळापूर्वीच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' असं केलं गेलं. 'दलित' असा उल्लेख करण्याऐवजी 'अनुसूचित जाती', 'नवबौद्ध' असा उल्लेख करण्याच्या मार्गदर्शक सूचनाही देण्यात आल्या. सरकारी कामकाजांत तशी काळजी घेतली जाते. माध्यमांतही या संदर्भातील बदल झाले. गाव, शहरं, रस्त्यांची जातीवाचक नांवं बदलण्याबाबत तामिळनाडू सरकारने एप्रिल महिन्यात निर्णय घेऊन या महिन्यात त्यासाठीची कालमर्यादाही घालून दिली. महाराष्ट्र सरकारने कालमर्यादा, वेळापत्रक दिलं नसलं, तरी धोरणात्मक निर्णय घेतला आहे. सरकारच्या या दिशानिर्देशानंतर संपूर्ण जिल्ह्यासाठी असा निर्णय घेण्याचं क्रांतिकारक पाऊल केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यानेच उचललं असल्याचं दिसतं आहे. तुकड्यातुकड्यांनी अनेक ठिकाणी बदल झाले असतील. यापुढेही होतील. पण, एखादा कालसुसंगत निर्णय घेतल्यानंतर त्याची धडाकेबाज अंमलबजावणी करण्यासाठी वैचारिक स्पष्टता असावी लागते. राजकीय नेतृत्वाने पुढाकार घेतला, तर प्रशासनालाही त्याच्या अंमलबजावणीसाठी हुरूप येतो. सिंधुदुर्गात आपल्याला तेच दिसतं आहे. थोडं या निर्णयापलीकडे पाहिलं, तर आजच्या युवा नेतृत्वामध्ये मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची तडफ, विकासाची दृष्टी आज संपूर्ण महाराष्ट्रात वाखाणली जाते आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोपवलेल्या जबाबदारीचं ते ज्या पद्धतीने सोनं करताहेत, ते पाहून हे दोन्ही विभाग हिरीरीने कामाला लागले आहेत. त्याचा लाभ महाराष्ट्रातील त्या व्यवसायातील नागरिकांना होतो आहे. आपल्या या 'धडक निर्णय, तडक अंमलबजावणी' शैलीचा प्रत्यय त्यांनी सामाजिक विषयातही दाखवला असल्याने महाराष्ट्राच्या इतिहासात त्याची कायमस्वरूपी नोंद होणार, हे निश्चित.

## तळोद्यात दिवाळीचा 'सेवा सन्मान' आणि 'गोसेवा'चा आदर्श!

# सहयोग सोशल ग्रुपतर्फे सफाई कामगार व पोलिसांचा गौरव; सेवाभावे प्रतिष्ठानकडून वसुबारसेला गोपूजन संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नमस्कार! तळोदा शहरात दीपावलीच्या पावन पर्वावर दोन महत्त्वाचे सामाजिक उपक्रम उत्साहात संपन्न झाले. एकीकडे सहयोग सोशल ग्रुपने शहरातील सफाई कामगार आणि पोलीस अधिकारी-कर्मचारी यांच्या सेवेचा सन्मान करत दिवाळी फराळ वाटप केले, तर दुसरीकडे सेवाभावे प्रतिष्ठानने वसुबारस निमित्त भव्य गोपूजन करून गोसेवेचे महत्त्व अधोरेखित केले.

सहयोग सोशल ग्रुपतर्फे जुने नगरपालिका कार्यालयाच्या प्रांगणात 'सेवा सन्मान कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. शहरात स्वच्छता राखणाऱ्या पालिकेच्या सफाई कामगारांना गोडधोड दिवाळी अंतर्गत फराळ (चिवडा व मिठाई पॅकेट) वाटप करण्यात आले. यासोबतच, रात्रंदिवस कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी झटणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवेचा सन्मान करत पोलीस ठाण्यात जाऊन त्यांनाही फराळ पॅकेट वाटप करून त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.

यावेळी पोलीस निरीक्षक राजेंद्र लोखंडे, सहयोग सोशल ग्रुपचे अध्यक्ष डव्होकेट अल्पेश जैन, उपाध्यक्ष डॉक्टर योगेश बडगुजर, डव्होकेट किशोर चव्हाण, अशोक सूर्यवंशी, पंडित भामरे, राजाराम राणे, शरद सूर्यवंशी, महेंद्र सूर्यवंशी, चेतन शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शरद सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले, तर अल्पेश जैन यांनी आभार मानले.वसुबारसेला भव्य गोपूजन व गोपालकांचा सन्मान.वसुबारस या पवित्र पर्वाच्या निमित्ताने सेवाभावे प्रतिष्ठान, तळोदा



तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रद्धा आणि पारंपरिक उत्साहात भव्य गोपूजन कार्यक्रम पार पडला. गायींचे विधीवत पूजन करून त्यांना चना, डाळ व गूळ खाऊ घालण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात विश्व हिंदू परिषद जिल्हा कार्यकारिणी सदस्य प्राध्यापक राजाराम राणे यांच्या हस्ते विधीवत गोपूजनाने झाली. त्यानंतर सेवाभावे प्रतिष्ठानचे अध्यक्ष उमेश सोनवणे यांच्या हस्ते गोसेवेत मोलाचे योगदान देणाऱ्या भरवाड समाजातील अजुभाई भरवाड, रणछोड भरवाड, पिटु भरवाड, गोकुळ भरवाड, लाला भरवाड, राजू भरवाड या गोपालक बांधवांचा सन्मान करण्यात आला.

उमेश सोनवणे यांनी गोसेवा हीच ईशसेवा असल्याचे सांगत गोपालक बांधवांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत विशेष संपर्कप्रमुख विजयराव सोनवणे, डॉक्टर शांतीलाल पिंपळे, मुकेश जैन, राजेश चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन शिरीष माळी, संतोष चौधरी, अनिल नाईक व अतुल पाटील यांनी केले.

## तोरणमाळात पर्यटनाद्वारे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना!

# होम स्टे प्रशिक्षणासह, रूरल मार्ट व थीम पार्क उभारणीचे महत्त्वपूर्ण निर्णय

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तोरणमाळ येथील पर्यटन विकासाला अधिक व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत स्थानिक महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत, पर्यटकांना उत्तम सेवा देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक संस्था आणि पर्यटन क्षेत्रातील संबंधित घटक या बैठकीत सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी तोरणमाळमध्येमहाराष्ट्र आरोग्य व महिला विकास संस्था मार्फत सुरू असलेल्या 'होम स्टे' सेवा अधिक व्यावसायिक




पद्धतीने चालवल्या जाव्यात यावर भर दिला. यासाठी स्थानिक महिलांना 'दिवे आगार' येथे विशेष प्रशिक्षण आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या प्रशिक्षणातून महिलांना पर्यटनाशी निगडीत सेवा अधिक सक्षमपणे पुरवता येणार आहे.स्थानिक महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी 'रूरल मार्ट' सुरू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. या रूरल मार्टच्या माध्यमातून बचत गटांची उत्पादने थेट पर्यटकांपर्यंत पोहोचून त्यांच्या विक्रीत वाढ होण्यास मदत होईल. याव्यतिरिक्त, बचत गटांच्या सहभागातून पर्यटकांसाठी आकर्षक 'कॅफे' सुरू करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. यामुळे स्थानिकांना पर्यटनाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी मिळतील.

**थीम पार्क आणि सफारी सेवा:**

पर्यटकांना तोरणमाळकडे अधिक आकर्षित करण्यासाठी वनविभागाकडून 'बायोडायव्हर्सिटी/थीम पार्क' उभारणीसाठीचा प्रस्ताव सादर करण्यात आला. या महत्त्वपूर्ण प्रस्तावासोबतच, तोरणमाळ परिसराची नैसर्गिक सुंदरता अनुभवता यावी यासाठी 'सफारी सेवा' सुरू करण्याची सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिली.

या सर्व प्रस्तावांमुळे तोरणमाळ परिसरातील पर्यटनाला नवी गती मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण वाढ होण्याची अपेक्षा आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे तोरणमाळ लवकरच एक व्यावसायिक आणि रोजगारक्षम पर्यटन केंद्र म्हणून विकसित होईल.

# ज्यांनी प्रत्यक्षात कधी निवडणूका लढवल्या नाहीत, बुथ लेवलचं मतदान कसं होतं हे माहिती नाही ते टिकाटिपण्णी करत आहेत – सुनिल तटकरे

**दैनिक वादळ वार्ता । मुंबई । प्रतिनिधी**

ज्यांनी प्रत्यक्षात कधी निवडणूका लढवल्या नाहीत आणि बुथ लेवलचं मतदान कसं होतं हे माहिती नाही त्यांना टिकाटिपण्णी करणं सोपं आहे असा जोरदार टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना विरोधकांना लगावला.

आम्ही सर्व निवडणूका लढलो आहे आणि निवडणूका लढायच्या आधी पोलिंग एजंट म्हणून काम केले आहे. मतदार स्लीपा ही वाटल्या आहेत. शिवाय काऊटींग एजंटही काम केले आहे हे सांगतानाच प्रत्येक पक्षाचा डीएलओ मतदान केंद्रामध्ये अधिकृतरीत्या निवडणूक आयोगाकडून नेमलेला असतो तो त्याची छाननी करु शकतो आणि किती मतदान झाले किंवा खोटं झालं की मतदान होत असताना ओळखपत्र अनिवार्य असते अशी माहितीही सुनिल तटकरे यांनी दिली.

निवडणूक प्रक्रिया होते त्यावेळी सगळ्या राजकीय पक्षाच्या उमेदवारांचे पोलिंग एजंट त्या मतदान केंद्रात बसलेले असतात. मात्र



गेले दोन दिवस विरोधी पक्षाचे नेते निवडणूक आयोगाला भेटले त्यांनी त्यांच्या पक्षाच्या माध्यमातून दिर्घकाळ ती प्रक्रिया केलेली आहे. परंतु विरोधकांना नॅरेटिव्ह सेट करायचा असेल तर करु द्या असे स्पष्ट मतही सुनिल तटकरे यांनी व्यक्त केले.

# ठाणे महापालिका कर्मचाऱ्यांना २४,५०० रुपयांचे सानुग्रह अनुदान

**दैनिक वादळ वार्ता । ठाणे**

यावर्षी दिवाळी सणाच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना २४५०० रुपये इतके सानुग्रह अनुदान देण्याचे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांना दिले आहेत. या निर्णयामुळे महापालिकेच्या ९२२१ कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात जाणार असून सर्व कर्मचाऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत. गेल्यावर्षी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी दिवाळीच्या निमित्ताने २४००० रूपयांचे सानुग्रह अनुदान देण्यात आले होते. यावर्षी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार सन २०२५ साठी महापालिका कर्मचाऱ्यांना २४५०० रुपयांचे सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आले आहे. हे सानुग्रह अनुदान कर्मचाऱ्यांच्या खात्यात




तत्काळ जमा करण्यात येणार आहेत. कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सानुग्रह अनुदानाचा निर्णय घेतला आहे.

ठाणे महापालिकेचे कर्मचारी वर्षभर सर्व यंत्रणा सुरळीत सुरू रहावी यासाठी कार्यरत असतात. त्यांच्या सणाच्या आनंदात भर म्हणून हा सानुग्रह अनुदानाचा निर्णय घेण्यात आला आहे. सानुग्रह अनुदान जाहीर झाल्यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. ठाणे महापालिकेचे ६०५९ कर्मचारी, शिक्षण विभागाचे ७७४ कर्मचारी, परिवहन विभागाचे १४०० कायम कर्मचारी, महापालिकेचे थेट कंत्राटी कर्मचारी व इतर असे ९८८ कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे, ठाणे महापालिकेवर सानुग्रह अनुदानापोटी सुमारे २३ कोटी इतके अतिरिक्त दायित्व येणार आहे.

## शरद पवारांचा दिवाळी पाडवा यंदा नाही

# बारामतीतल्या गोविंदबागेत कार्यकर्ते-जनतेच्या भेटीही नाहीत; सणावर पूरसंकटाची काळी छाया

**दैनिक वादळ वार्ता । मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यंदा दिवाळी साजरी करणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. महाराष्ट्रातील पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांनी हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे. या संदर्भात शरद पवारांनी एका परिपत्रकाच्या माध्यमातून यंदाची दिवाळी साजरी करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून जाहीर करण्यात आलेल्या पत्रकानुसार, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मभूषण शरदचंद्र पवार साहेब हे दरवर्षी दीपावली पाडवा सणानिमित्त बारामती येथील गोविंदबाग येथे त्यांच्या निवासस्थानी जनता व कार्यकर्त्यांकडून शुभेच्छा स्वीकारण्यासाठी उपलब्ध असतात. परंतु, यावर्षी दीपावली



पाडवा सणानिमित्त शरद पवार गोविंदबाग किंवा अन्य ठिकाणी उपस्थित राहणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. दरवर्षी पाडव्याच्या दिवशी राज्यभरातील राजकीय नेते, आमदार, खासदार, उद्योगपती आणि सामान्य नागरिक बारामतीत येऊन पवार कुटुंबाला शुभेच्छा देतात. बारामतीतील गोविंदबागेत पवारांचे पारंपरिक स्वागत केले जाते आणि याच दिवशी अनेक राजकीय चर्चाही रंगतात. परंतु, यंदा दिवाळी साजरी केली जाणार नाही.महाराष्ट्रात यंदाच्या पावसाळ्यात मराठवाड्यासह राज्याच्या अनेक भागांमध्ये पूर परिस्थिति निर्माण झाली. या अतिवृष्टीत शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या शेतात अक्षरशः तलाव तयार झाले होते आणि पिके वाहून गेली होती. अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने संसार उघड्यावर पडले. अशा परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून अतिवृष्टी बाधित कुटुंबीयांना मदत देखील देण्यात आली.

# केवळ शिक्षितच नाही, तर सुसंस्कारित पिढी घडणे गरजेचे-सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

## ज्युनियर आयएएस स्पर्धा परीक्षेत प्रमोदजी महाजन शाळेचे लक्षवेधी यश ; लातूर येथे ४६ राज्यस्तरीय प्रज्ञावंतांचा भव्य सत्कार

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संस्कार प्रकाशन, लातूर यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या ज्युनियर आयएएस स्पर्धा परीक्षेतील प्रज्ञावंतांचा राज्यस्तरीय सत्कार समारंभ गुरूवार, दिनांक १६ ऑक्टोबर रोजी लातूर येथील दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आला होता.या समारंभास उद्घाटक म्हणून शिक्षक आमदार विक्रम काळे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मधुकरराव गायकवाड (माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), सुधाकर तेलंग (विभागीय अध्यक्ष माध्यमिक शिक्षण विभाग, लातूर), मनोज धस (शिक्षण विस्तार अधिकारी बीड), डॉ.महादेव गव्हाणे (प्राचार्य, शाहू महाविद्यालय, लातूर) तसेच डॉ.राजेश इंगोले (सुप्रसिद्ध मनोसोपचार तज्ज्ञ, अंबाजोगाई.) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. लातूरच्या दयानंद हॉल येथे आयोजित भव्य दिव्य अशा कार्यक्रमात शाळेच्या ४६ राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे



उद्घाटन करताना आमदार विक्रम काळे यांनी डॉक्टर्स, इंजिनियर्स याच फक्त करिअरच्या वाटा नसून जिल्हाधिकारी, तहसीलदार, न्यायाधिश, खेळाडू, चित्रकार, असे अनेक करिअर विषयक पर्याय विद्यार्थ्यांपुढे उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना ओळखून शिक्षकांनी आणि पालकांनी त्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी वाट करून दिली पाहिजे असे प्रतिपादन आ.काळे यांनी केले. तर विभागीय संचालक सुधाकर तेलंग यांनी शिक्षणासोबत संस्कार देणे आवश्यक आहे. आणि संस्कारित पिढी ही देशाला महासत्ता घडवीत असते असे प्रतिपादन केले. शिक्षण विस्तार अधिकारी मनोज धस, बीड यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना ओळखून त्यांना संधी निर्माण करणे ही काळाची गरज आहे. मराठवाड्यात महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षा यांना पालक व शिक्षक महत्त्व देत नाहीत. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी निर्माण होत नाहीत अशी खंत त्यांनी व्यक्त केली. यावेळी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांनी आजची पिढी अत्यंत वेगवान आहे. गतिमान आहे. सोशल मीडियाचा प्रचंड वापर करणारी आहे. या पिढीला योग्य मार्गदर्शन जर केले तर या पिढीमध्ये भारताला महासत्ता बनविण्याची ताकद निश्चितच आहे असे वक्तव्य केले. सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी मनोगत व्यक्त करताना शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यामध्ये सुसंवाद असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यामध्ये संस्कार असो वा शिक्षण ते देण्याचे काम शिक्षक व पालक करीत असतात. केवळ शिक्षितच पिढी नाही. तर सुसंस्कारित पिढी घडणे गरजेचे आहे. त्यासाठी पालक व शिक्षकांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. पालकांनी आपला पाल्य शाळेत काय करीत आहे. समाजात वावरत असताना काय करीत आहे. त्याच्या वर्तणुकीवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. ज्युनियर आयएएस स्पर्धेचे संकल्पक ओम प्रकाश जाधव यांनी ही स्पर्धा ठेवण्यामागचे कारण, विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा बाबत आकर्षण निर्माण व्हावे आणि संपूर्ण महाराष्ट्रभरातून अनेक आयएएस, आयपीएस अधिकारी निर्माण झाली पाहिजे हा हेतू असल्याचे स्पष्ट केले. या सर्व प्रज्ञावंतांचे अभिनंदन शाळेच्या प्रमुख मार्गदर्शिका खासदार पुनमताई महाजन, संस्थेच्या अध्यक्षा सौ.मंगला कुलकर्णी, सचिव शैलेश कुलकर्णी, प्राचार्य डॉ.योगेश कुळकर्णी व गितांजली कुलकर्णी सर्व शिक्षकवृंद यांनी केले आहे.

# वाचन संस्कृती जोपासून सुसंस्कृत पाल्य घडविणे पालकांचे कर्तव्य-प्रो.डॉ.मनोहर सिरसट

## प्रकाश आंबेडकर नगर बीड येथे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती विविध उपक्रमाने संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

वाचाल तर वाचाल हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अनमोल उपदेश लक्षात ठेवून वाचन संस्कृती जोपासून सुसंस्कारित पिढी घडविण्यासाठी पालकांनी लहानपणीच आपल्या पाल्यांच्या हातात चांगली पुस्तके देऊन आपले पाल्य सुजाण,सदाचारी नागरिक बनण्याकरिता प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हे पालकांचे आद्य कर्तव्य आहे ; माजी राष्ट्रपती थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ.ए पी जे अब्दुल कलाम यांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त हेच खरे अभिवादन ठरेल असे प्रतिपादन प्रो. डॉ. मनोहर सिरसट यांनी केले. महामानव अभिवादन ग्रुप संचलित मोफत शिकवणी वर्ग प्रकाश आंबेडकर नगर बीड येथे वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयातर्फे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची संयुक्त जयंती विविध उपक्रमाने संपन्न करून वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमास अध्यक्षपदी से.नी. सी.ई.ओ( जि. प )आयु.पी व्ही बनसोडे तर प्रो.डॉ. मनोहर सिरसट,प्रो डॉ. उपप्रचार्य उत्तमराव साळवे, सिद्धार्थ शिनगारे व एस. एस सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते विचार पिठावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले, समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ आठवले, प्राध्यापक अशोक गायकवाड व ड तेजस वडमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.सर्वप्रथम आदर्शांची पूजा करून डॉ. एपीजे अब्दुल कलाम व दादासाहेब गायकवाड यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प व पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाचाल तर वाचाल चे आयु डी.जी वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन डी. एम राऊत यांनी केले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली होती त्या स्पर्धेतील प्रथम बक्षीस १००० रुपये प्रा. डॉ. नामदेव शिनगारे, द्वितीय बक्षीस ७०० रुपयांची स्पर्धा परीक्षेकरिता उपयोगी ११ पुस्तकांचा संच वाचाल तर वाचाल तर्फे,तिसरे बक्षीस ५०० रुपये पी. व्ही बनसोडे यांनी दिले व ८ विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ प्रत्येकी १०० रुपये बक्षीस समाजसेवक प्रशांत वासनिक व यु एस वाघमारे यांच्यातर्फे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. तसेच ९ वी ते १२ वी वर्गातील खुल्या गटातील ३ विद्यार्थ्यांना बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनालयातर्फे देण्यात आला. ह्या प्रसंगी वाचन प्रेरणा दिना बद्दल,भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवा बद्दल व संविधाना बद्दल तसेच पंचशीलाचे महत्व अस्खलित



व मधुर आवाजात पंचशील म्हणून पालीचा मराठी अर्थ सांगणाऱ्या विद्यार्थ्यांना आदर्श महापुरुषांचे व महामातांचे जीवन चरित्र पुस्तके व पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मासिक घटक चाचणीतील गुणवंत ८ विद्यार्थ्यांना वही व पेनाचे वाटप करण्यात आले. वाचाल तर वाचाल चे पहिले केंद्र असलेल्या या केंद्रास आठव्या फेरीतील ५० पुस्तकांचा संच शिक्षिका विशाखा वाघमारे यांना सुपूर्द करण्यात आला वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाला प्रो.डॉ मनोहर सिरसट यांनी स्वलिखित महामानावाची पुस्तके, सुंबरण व आदर्श महापुरुषांची जीवन चरित्र अशी ११ पुस्तके वाचनालयाला भेट दिली. विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना प्रो डॉ. उत्तमराव साळवे म्हणाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून उच्च शिक्षण घेऊन कर्तुत्वान बना व आपल्या कार्यातून तुमच्या हातून समाजसेवा घडो असा उपदेश केला. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे उजवाहात समजल्या जाणाऱ्या थोर समाजसेवक दादासाहेब गायकवाड यांच्या जयंतीदिनी हे सोप्या भाषेत अनेक उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना सर्वोत्परी महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचालच्या माध्यमातून मदत देण्याचे ठोस आश्वासन दिले.विचारवंत सिद्धार्थ शिनगारे यांनी इंग्रजी भाषेतून उच्च शिक्षण,वैज्ञानिक दृष्टिकोनाची जीवनशैली व उच्च ध्येय डोळ्यसमोर ठेऊन ते कसे प्राप्त कसे करावे याबद्दल डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनातील वाचणाच्या व ग्रंथाच्या सहवासातील अनेक प्रसंग सांगितले. अध्यक्षीय समारोपात बनसोडे पी.व्ही यांनी मोलाचा उपदेश देताना म्हणाले की मोफत शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांना लागलेली वाचनाची गोडी व प्रगती बघून समाधान व्यक्त केले व मुलांनी पुस्तकाच्या सहवासात राहून आपल्या ज्ञानात भर घालावी तसेच आपण केलेल्या वाचनाचे मुद्देसूद टिपणं ठेवावे म्हणजे ते पुढील स्पर्धा परीक्षे करिता उपयोगी येतील.

कार्यक्रमास परिसरातील विद्यार्थी, पालक व उपासक उपासिका यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.जगदीश वाघमारे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रशिक जाधव, रसिका जाधव यांनी कष्ट घेतले शेवटी सरणात्तय व अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# तांबव्यात सोयाबीनची गंज जाळली शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान




दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील तांबवा शिवारातील सर्व्हे नं.३१ मधील महादेव उत्तम चाटे या शेतकऱ्याने शेतातील सोयाबीनचे पीक काढून त्याचा ढीग (गंजी) रचून ठेवला होता.त्याला खोडसाळपणे अज्ञात आरोपीने पेटवून जाळून टाकल्यामुळे आपली दिड लाख रुपयाची हानी झाल्याची फिर्याद महादेव उत्तम चाटे यांनी दिल्या वरून अज्ञात आरोपी विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.तांबवा शिवारातील सर्व्हे नं ३१ मध्ये महादेव उत्तम चाटे यांची जमीन आहे. त्यांनी आपल्या जमिनी वरील सोयाबीनचे पीक काढून एका ठिकाणी ढीग (गंजी ) करून ठेवले होते. दरम्यान बुधवारी दि.१५ ऑक्टोबर रोजी रात्री ७ ते गुरुवारी दि.१६ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात इसमाने खोडसाळ हेतूने व नुकसान करण्याच्या हेतूने सोयाबीन पिकाच्याकाढून ठेवलेल्या ढिगाला गंजीला आग लावून पेटवून दिल्यामुळे दिड लाखाची हानी झाल्याची फिर्याद महादेव उत्तम चाटे या तांबवा येथील शेतकऱ्याने दिल्यावरून अज्ञात आरोपीविरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आसून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली जमादार बाबासाहेब सानप हे पुढील तपास करीत आहेत.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत शिवसेनेची रणनीती बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची एक महत्त्वपूर्ण रणनीती बैठक मुंबई येथे संपन्न झाली.दिनांक १५ ऑक्टोबर २०२५,वार गुरुवार रोजी ही बैठक घेण्यात आली.या बैठकीत आगामी निवडणुकांमध्ये पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याबाबत तसेच ग्रामीण मतदार संघात शिवसेनेचा प्रभाव वाढविण्यासाठी विविध रणनीतींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.या बैठकीला शिवसेनेचे नेते व खासदार श्रीकांत शिंदे, शिवसेना नेते रामदास कदम,शिवसेना सचिव संजयजी मोरे,शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी तसेच मराठवाडा संपर्क प्रमुख,माजीमंत्री अर्जुन खोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



बैठकी दरम्यान आगामी निवडणुकांचे नियोजन, स्थानिक संघटनांचे बळकटीकरण,युवा नेतृत्वाचा सहभाग,तसेच प्रभागनिहाय प्रचार मोहीमेचे नियोजन अशा विविध विषयांवर सखोल चर्चा झाली.जिल्हापातळी वरील पदाधिकाऱ्यांनी आपले मत मांडत निवडणूक विजयासाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.या बैठकीस जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक,जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर,शिवसेना विधानसभा प्रमुख केज दादासाहेब ससाणे, शिवसेना तालुकाप्रमुख केज पृथ्वीराज पाटील, तालुकाप्रमुख अंबाजोगाई अर्जुनराव वाघमारे,युवा सेना तालुकाप्रमुख केज दत्तकुमार काकडे तसेच विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीनंतर पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व मतदार संघांमध्ये प्रभावी संघटन उभारणीसाठी समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत शिवसेनेचा झेंडा प्रत्येक मतदारसंघात फडकविण्याचा आत्मविश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या महत्त्वपूर्ण बैठकीमुळे शिवसेनेची निवडणुकी साठीची रणनीती अधिक भक्कम झाली असल्याचे पक्षातील सूत्रांनी सांगितले.

# वाल्मिकी ऋषींनी रामायण लिहले नसते तर समाज घडला नसता-जयपाल रावल

दैनिक वादळ वार्ता

**लाला चव्हाण । वडाळी**

शहादा तालुक्यातील बामखेडा येथे वाल्मिक ऋषी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व जल्लोष मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते..

दि......रोजी वाल्मिक ऋषी जयंती साजरी होणार होती परंतु सामाजातील काही युवक सप्तशृंगी गडावर गेले असल्याने दि १६ गुरुवारी भव्य अभिवादन मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी राम मंदिर येथे वाल्मिक ऋषींच्या प्रतिमेला जयपाल रावल यांनी भेट देत अभिवादन करण्यात आले यावेळी ते



बोलत होते..वाल्मिक ऋषींनी रामायण लिहले नसते तर समाजाला व देशाला दिशा मिळाली नसती वाल्मिकी ऋषींनी लिहलेल्या रामायणामुळे आजची संस्कृती टिकून आहे.

यावेळी गावातील सरपंच मनोज चौधरी यांच्या कडून जयपाल रावल यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी पीक संरक्षण सोसायटीचे चेरमन नरेंद्र पटेल, व्हा. चेअरमन चेतन चौधरी, रमाकांत चौधरी, अरुण चौधरी, राहुल गवळे, विलास गवळे, नागसेन गवळे सुभाष चौधरी, भाऊराव बोरसे, राजेंद्र चौधरी, किरण सोनवणे प्रशांत पटेल,संजय सोनवणे राकेश कुवर महाले, राकेश कुवर, गणेश भरत वडार,दगा कोळी, जयेश चौधरी,आदी पंचकोशीतील नागरिक व समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार किशोर चित्ते यांनी मानले..

तर सायंकाळी ४ वाजेपासून तर १० वाजेपर्यंत सम्पूर्ण गावात वाल्मिक ऋषींच्या प्रतिमेची रथावर रोषणाईची सजावट करून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी सारंगखेडा सहा.पोलीस निरीक्षक रमेश वावरे व कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

# तळोदा तालुक्यात जिल्हा परिषद व पं.स.आरक्षण जाहीर; बोरद गट अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव

दैनिक वादळ वार्ता

**बोरद । मंगेश पाटील**

तळोदा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे आरक्षण जाहीर झाले असून, बोरद जि. प. गट हा अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव ठरला आहे. या निर्णयामुळे अनेक इच्छुक पुरुष उमेदवारांचा हिरमोड झाला असून, तालुक्यात नव्या राजकीय समीकरणांना सुरुवात झाली आहे.मागील निवडणुकीत भाजपच्या सुनिता भरत पवार यांनी विजय मिळवला होता. यंदा पुन्हा ही जागा महिलांसाठी राखीव झाल्याने भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी व माकप या पक्षांकडून तगड्या महिला उमेदवारांचा शोध सुरू आहे.भाजपमध्ये अंतर्गत



गटबाजी उफाळून आल्याचे दिसत असून, काँग्रेसनेही जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. बोरद गटातील ही निवडणूक तळोदा तालुक्याची प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# रस्त्यावरील मोकाट गोमातेच्या रक्षणासाठी समाजाने पुढाकार घ्यावा-राजेंद्र मस्के

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

आज गोवत्स द्वादशी वसुबारस निमित्ताने कै.तुकाराम गुरुजी गोधाम प्रकल्प शिवदरा पालवण येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हा परिषद उपाध्यक्षा सौ.जयश्रीताई मस्के यांनी सहकुटुंब पारंपरिक पद्धतीने पुजन करून गोमातेचेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करत वसुबारस सण साजरा केला. दीपावली पर्वाचा प्रारंभ वसुबारस सणापासून सुरू होतो. खऱ्या अर्थाने वसुबारस सण म्हणजे मातृत्व, संवेदनशीलता आणि कृतज्ञतेचा हा सण! आधुनिक काळातही हा सण आपल्याला स्मरण करून देतो की, शेती, निसर्ग आणि जनावरांशी आपले नाते हे केवळ उपजीविकेचे नाही, तर संस्कृतीचे आहे. हिंदू धर्मात गाय ही आईच्या दर्जाची पूजनीय तर असुन संस्कृतीचे प्रतीक आहे. अनेक कुटुंबांसाठी उपजीविकेचे साधन आहे. ग्रामीण भागात वसुबारस सादर करण्याची पुरातन पद्धत आहे. आनंदाने आणि प्रेमाने साजरा करतात. ग्रामीण अर्थकारणात गोवंशाचे योगदान आजही अतुलनीय आहे. परंतु गोमातेचीवसुबारसच सणाच्या एका दिवसा पुरती पूजा आरती नको तर वर्षभर गोमातेच्या रक्षणाचा संकल्प करावा लागेल. आज गोमाता व गोवंशाची परिस्थिती लक्षात घेता ती जिवंत राहिली, तरच शेतकऱ्यांची शेती, दुधाचा जोडधंदा आणि संस्कृती टिकून राहील. प्रत्येक गायीचे रक्षण हा राष्ट्रधर्म ठरला पाहिजे. गोमातेचा सन्मान कृतीतून दिसला पाहिजे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी वसुबारस गोमाता पुजन निमित्ताने केले आहे........ जिथे गोमातेचा सन्मान येथे समृद्धी नांदते यावर हिंदू धर्मीयांचा अतूट विश्वास असल्यानेआनंदी जीवनासाठी अंगणात गाय बांधून संगोपन केले जाते. सर्वत्र गोहत्या बंदीचा जागर केला जातो. तर दुसरीकडे रोज स्त्यावर मोकाटपणे भटकणाऱ्या गायींच्या हालअपेष्टा मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. रस्त्यावर उपाशीपोटी गायी फिरतात. प्लास्टिक खातात त्यातून त्यांच्या आरोग्याला बाधा होते. प्रसंगी मोकाट जनावरांना प्राणही गमवावे लागतात. वाहतुकीला अडथळा निर्माण करतात त्यातून अपघात घडतात, अनेकदा गायी पण जखमी होतात. अपंगत्व प्राप्त होते. ही लाजिरवाणी व वेदनादायी वस्तुस्थिती आहे. मोकाट जनावराच्या संगोपनासाठी आपण बीड नगर परिषद प्रशासनाकडे प्रस्ताव दिला होता परंतु त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. गोमातेच्या सन्मानासाठी गोहत्या बंदी कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या प्रत्येक गाईंच्या रक्षणासाठी समाजाने संवेदनशील मनाने पुढाकार घ्यावा ही आग्रहाची विनंती.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077